नि.फौ.ख.क्र. ११३/२०२१
सरकार / टोपेश
नि.क्र. २०

सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी,
मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांव : युवराज दागण कावळे
वय : ५६ वर्षे, कामधंदा : शेती
राहणार : गिरोला, ता.आमगांव, जि.गोंदिया

सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु

१. मी आरोपींना ओळखतो. आरोपी क्र. २ व ४ आज रोजी न्यायालयात हजर आहेत. दिनांक ०७/०५/२०२१ रोजी सकाळी ९:०० च्या सुमारास मी परमानंद सोयाम याला माझ्या घरात संडास बाथरुम दुरुस्त करण्याकरीता बोलवायला गेलो होतो. त्याने मला जेवण करतो तो पर्यंत बसा व मी तुमच्या सोबत येतो असा म्हणाला. त्यावेळी टोपेश मेश्राम आरोपी क्र. १ हा तेथे आला. त्याने मला शिवीगाळ केली. मी त्याला शिवीगाळ करु नको असे सांगितले असता तो मला म्हणाला की, तु माझा वडीलांचा रात्री अपमान केलास. त्याने मला लोखंडी रॉडने माझ्या उजव्या पायावर मारले. त्यानंतर त्याने आरोपी क्र. २ ते ४ यांना तेथे बोलाविले. त्यांनी मला बासाच्या काठीने माझ्या उजव्या मांडीवर व पाठीवर व हातावर मारले. आरोपी क्र. ३ यांनी मला बासाच्या काठीने मारहाण केली. त्यानंतर त्यांनी मला रस्त्यावर खाली पाडले व मारहाण केली. त्यानंतर तुझा मर्डर करायला आलो आता तुझ्या तोंडातून रक्त निघत आहे आता जाऊ दया असे ते म्हणत होते. मी त्यानंतर पोलीस ठाण्यात येऊन फिर्याद दाखल केली. आता मला सदरची फिर्याद दाखविली. सदरची फिर्याद तीच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. २१ देण्यात येते. ज्या लोखंडी रॉडने मारहाण झाली तो दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता सदरचा लोखंडी रॉड मुद्देमाल क्रमांक ०४/२०२४ दाखविण्यात आला. सदरचा लोखंडी रॉड तोच आहे. त्यास आर्टीकल अ देण्यात येते. ज्या बासाच्या काठीने मारहाण झाली ते दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता सदरचे बासाची तिन काठी दाखविल्या. सदरचा बासाच्या काठया त्याच आहेत. त्यांना अनुक्रमे आर्टीकल ब ते ड देण्यात येते.

सरतपास पुर्ण

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री एम. बी. यादव यांचे मार्फत सुरु-

२. आमच्या गावामध्ये दिडशे घरे असतील. परमानंद सोयाम याचे घराच्या शेजारी तिन ते चार घरे आहेत. परमानंदच्या शेजारी धुरपताबाई नेवारे, किर्तण दुधबर्वे, सुखराम उईके यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे सिमेंटचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावरुन लोकांचे येणे जाणे असते. घटनेच्या वेळी तेथे लोक जमा झाले नाहीत. घटना झाल्यानंतर देखील लोक आले नाहीत. मी परमानंद याचे घरी माझ्या दुचाकी वरुन गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांच्या सोबत माझा पुर्वीचा वाद होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझे शेत एकमेकाला लागून आहे. आरोपी व माझ्या शेताच्या

मध्ये तिन चार शेत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल आर्टीकल अ लोखंडी रॉड सारखी रॉड हे बांधकामा जवळ मिळू शकतात. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल आर्टीकल ब ते ड सारख्या बासाच्या काठया या कोणाच्या घरी व शेतावर मिळून येऊ शकतात. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या एका दिवसापुर्वी माझा व आरोपींमध्ये शेतीच्या पाण्यावरुन भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या शेतातून माझ्या शेतात पाणी येते. हे म्हणणे खरे नाही की, माझा व आरोपींचा शेतीच्या पाण्यावरुन घटनेच्या तिन चार वर्षापुर्वी पासून वाद सुरु आहे. आरोपी क्र. २ याने मला बासाच्या काठीने पाठीवर मारले होते असे मी पोलीसांना सांगितले होते. आरोपी क्र. २ याने मला बासाच्या काठीने पाठीवर मारले असा मजकूर माझे पोलीसांसमोरील जवाबामध्ये  नमुद नाही. सदरचा मजकूर का नमूद नाही त्याचे कारण मी सांगु शकत नाही. आरोपी यांनी मला रस्त्यावर खाली पाडले असे मी फिर्याद देत असतांना पोलीसांना सांगितले होते. सदरचा मजकूर माझे फिर्यादी मध्ये नमूद नाही. सदरचा मजकूर माझे फिर्यादी मध्ये का नमूद नाही त्याचे कारण मी सांगु शकत होते. घटनेच्यावेळी माझा शर्ट बनियान हा रक्ताने भरलेला होता. तो शर्ट व बनियान मी पोलीसांना दाखविला होता. मी फिर्याद दयायचे वेळी माझ्या मुला सोबत गेलो होतो. आमचे गावापासून आमगांव पोलीस ठाणे १५ ते २० कि.मी. अंतरावर आहे.

३.            हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी देखील माझ्या विरुध्द तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला त्या कामातील समन्स प्राप्त झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन करतो त्याप्रमाणे दिनांक ०७/०५/२०२१ रोजी सकाळी ९:०० वाजता कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी परमानंद  याच्या घरी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ याने मला लोखंडी रॉडने मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ते ४ यांनी मला बासाच्या काठीने मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी पाठीवर, पायावर, हातावर व मांडीवर मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की,  आरोपी यांनी मला रस्त्यावर खाली पाडले नाही. माझे रक्ताने भरलेला शर्ट व बनियान पोलीसांनी जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला जिवे मारल्याची धमकी दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी मला शिवीगाळ केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींच्या विरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द पुर्व वैमन्यासातून मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी दारु पिऊन गाडी चालवित होतो व मी गाडी वरुन खाली पडलो व मला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही**.**

श्रवणोत्तर स्वीकृत

आमगांव                                                                    **(**समीर गोपाळ गुणारी**)**

दिनांक **:**  २०**/**०९**/**२०२५                                    न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग**,** आमगांव

नि.फौ.ख.क्र. ११३/२०२१

सरकार / टोपेश

नि.क्र. २२

<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची जबानी,</u>

<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>

माझे नांव : दुलीचंद धाडु टेंभरे

वय : ५६ वर्षे, कामधंदा : शेती

राहणार : गिरोला, ता.आमगांव, जि.गोंदिया

<u>सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु</u>

१. मी आरोपींना ओळखतो. फिर्यादीला ओळखतो. पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला नाही. पोलीसांनी केवळ माझी स्वाक्षरी घेतली. आता मला सदरचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. परंतू त्यामधील मजकूर काय आहे हे मला माहित नाही. स्वाक्षरी पुरती नि.क्र. २३ देण्यात येते.

**[साक्षदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकीलांनी उलटतपासात विचारता येण्याजोगे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली - परवानगी देण्यात येते. ]**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०८.०५.२०२१ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा माझे समक्ष केला व मला वाचून दाखवला व तो बरोबर असल्याने मी त्यावर स्वाक्षरी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री एम. बी. यादव यांचे मार्फत-

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

आमगांव (समीर गोपाळ गुणारी)

दिनांक : २०/०९/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव

नि.फौ.ख.क्र. ११३/२०२१

सरकार / टोपेश

नि.क्र. २४

<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची जबानी,</u>

<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>

माझे नांव : अशोक महेश दुधबर्वे

वय : ५२ वर्षे, कामधंदा : मजुरी

राहणार : गिरोला, ता.आमगांव, जि.गोंदिया

<u>सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु</u>

१. पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते. पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा तयार केला. आता मला सदरचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. परंतू त्यामधील मजकूर काय आहे हे मला माहित नाही. पोलीसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नव्हता. मी स्वतः तो वाचला नव्हता. स्वाक्षरी पुरती नि.क्र. २५ देण्यात येते.

**[साक्षदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकीलांनी उलटतपासात विचारता येण्याजोगे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली - परवानगी देण्यात येते. ]**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०८.०५.२०२१ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा माझे समक्ष केला व मला वाचून दाखवला व तो बरोबर असल्याने मी त्यावर स्वाक्षरी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री एम. बी. यादव यांचे मार्फत-

३. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनाम्यात काय लिहले हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझी केवळ स्वाक्षरी घेतली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नाही व तो कशाचा आहे हे देखील सांगितले नाही.

**उलटतपास पुर्ण**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

आमगांव

दिनांक : २०/०९/२०२५

(समीर गोपाळ गुणारी)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव